# जागतिक हवामान बदलावर औरंगाबादेत होणार मंथन

## गुरुवारपासून तीन दिवस आंतरराष्ट्रीय चर्चासत्र

**सकाळ वृत्तसेवा**

औरंगाबाद, ता. १२ : हवामान बदलामुळे कृषी व जलक्षेत्रांवर अनिष्ट परिणाम होत आहेत. राष्ट्रीय अन्नसुरक्षेच्या दृष्टीने ही चिंतेची बाब आहे. त्या अनुषंगाने राज्यातील चारही कृषी विद्यापीठे, जल व भूमी व्यवस्थापन संस्थेतर्फे (वाल्मी) १४ ते १६ डिसेंबरला वाल्मीत 'जागतिक हवामान बदल व त्याचे कृषी व जलक्षेत्रांवर होणारे बदल' या विषयावर आंतरराष्ट्रीय चर्चासत्र होणार आहे. परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. बी. वेंकटेश्वरलू यांनी मंगळवारी (ता. १२) पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

पद्मभूषण डॉ. आर. एस. परोडा यांच्या हस्ते गुरुवारी सकाळी दहा वाजता एमजीएमच्या रुक्मिणी सभागृहात चर्चासत्राचे उद्घाटन होईल. या वेळी नीती आयोगाचे सदस्य डॉ. रमेश चंद, चारही कृषी विद्यापीठांचे कुलगुरू, वाल्मीचे महासंचालक श्री. गोसावी, राजू बारवाले यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. अवकाळी पाऊस, पूर परिस्थिती, गारपीट, उष्णतेची लाट, पावसाचा खंड हे जागतिक प्रश्न आता जागतिक बनले आहेत. त्याचा कृषी उत्पादनासह नैसर्गिक साधनसामग्रीवरही परिणाम होत आहे. जमिनीतील सेंद्रिय कर्बाचे प्रमाण कमी होत आहे. पाणीसाठा कमी झाल्याने सिंचनाचे क्षेत्र कमी होत आहे. तसेच पिकांवर किडी व रोगांचा प्रादुर्भाव वाढत असल्याने उत्पादनात घट होत आहे. या सर्व घटकांवर सखोल चर्चा करण्यासाठी हे चर्चासत्र आयोजित करत असल्याचे डॉ. वेंकटेश्वरलू म्हणाले. या वेळी वाल्मीचे महासंचालक एच. के. गोसावी, ऑस्ट्रेलियाचे जलशास्त्रज्ञ कार्ल डॅमेन, डॉ. सुनील गोरंटीवार, डॉ. अविनाश गरुडकर, डॉ. ए. एस. ढवण, डॉ. भगवान आसेवार उपस्थित होते.

### विदेशातील शास्त्रज्ञ सहभागी होणार

**या चर्चासत्रात अमेरिका, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, इजिप्त, श्रीलंका, व्हिएतनाम, बांगलादेश, नेपाळ आदी देशांतील शास्त्रज्ञ सहभागी होणार आहेत. आजपर्यंत देशविदेशांतून ८०० संशोधनपर निबंध प्राप्त झाले असून, ६०० पेक्षा जास्त शास्त्रज्ञ व संशोधक या चर्चासत्रात सहभागी होणार असल्याचे संशोधन संचालक डॉ. दत्तप्रसाद वासकर यांनी सांगितले.**